03-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/2/2025 10:18 PM Page 1



## निवडक

### पणजी येथे ८ रोजी मोफत वैद्यकीय शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २ :** जागतिक रेडक्रॉस दिनानिमित्त मोफत वैद्यकीय शिबिर जागतिक रेडक्रॉस दिन २०२५ साजरा करण्यासाठी इंडियन रेडक्रॉस सोसायटी, गोवा आणि मणिपाल हॉस्पिटल्स गोवा यांनी ८ मे २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत पणजी गोवा येथील महानगरपालिका इमारतीत मोफत वैद्यकीय शिबिराचे आयोजन केले आहे. या वर्षीच्या दिवसाची थीम मानवतेला जिवंत ठेवणे आहे.

मणिपाल हॉस्पिटलमधील न्यूरोलॉजी, ऑन्कोलॉजी, डेंटलमधील प्रसिद्ध डॉक्टरांची जनरल चेकअपनंतर तपासणी करण्यात आली. मणिपाल हॉस्पिटलच्या टीममध्ये डॉ. शेफाली सिनाई सांगगावकर (दंत) डॉ. शोभित रायजादा (दंत), डॉ. अमृत एसडी (न्यूरोलॉजिस्ट), डॉ. वैभव शाख्य (रेडिएशन ऑन्कोलॉजी) आणि इतर आरएमओ यांचा समावेश आहे. पीसीसी कर्मचारी मोनिका, सुनील कुमार (ईएमटी) हे देखील हरी प्रसाद एम व्ही (मार्केटिंग हेड) आणि प्रवीण राणे (वरिष्ठ कार्यकारी) यांच्यासह उपस्थित राहतील. रेडक्रॉस गोवाचे सरचिटणीस जॉन आगियार यांनी लोकांना सहभागी होण्याचे आणि चांगल्या आरोग्य आणि मानवतावादी सेवेकडे एक पाऊल उचलण्याचे आवाहन केले आहे. आरोग्य तपासणी आणि जागरूकता या दिवसासाठी आमच्यात सामील व्हा. त्यांनी डॉ. शेखर साळकर, मणिपाल हॉस्पिटल्सचे मार्केटिंग प्रमुख हरी प्रसाद एम. व्ही, वरिष्ठ कार्यकारी प्रवींद राणे, मणिपाल हॉस्पिटल्सचे डॉक्टर आणि तांत्रिक कर्मचारी यांचे आभार मानले.

---

### मांद्रे येथील देवी भूमिका देवस्थानचा आजपासून उत्सव सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २ :** सावंतवाडा येथील श्री देवी भूमिका देवस्थानच्या उत्सव सोहळ्यानिमित्त शनिवार दि. ३ ते दि. १२ मे पर्यंत धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. सदर सोहळा श्री देवी भूमिका देवालय पटांगण,सावंतवाडा येथे होणार आहे.

यानिमित्त शनिवार दि. ३ मे रोजी रात्री १० वाजता संगीत 'लावणी भुलली अभंगाला' नाटक, रविवार दि. ४ रोजी रात्री ९ वाजता इस्वटी कला व सांस्कृतिक संघ, आयोजित वैभवी क्रीयेशन्स डिचोली, मराठी विनोदी नाटक 'अबोल प्रितीची अजब कहाणी' सादर होईल. सोमवार दि. ५ रोजी महापुरुष तरुण हौशी नाट्य मंडल, आयोजित व श्री कमळेश्वर विद्यालय पेठेचावाडा प्रस्तुत व श्री दयानंद वेंगुर्लेकर दिग्दर्शित बाल कलाकारांचे महान पौराणिक दशावतार नाटक 'मांठरगडची मांठरादेवी काळूबाई' होणार आहे. मंगळवार दि. ६ मे रोजी रात्री ९.३० वाजता हरिश शेटगावकर दिग्दर्शित कन्या ही सासुराशी जाये ' नाटक होणार आहे. बुधवार दि. ७ रोजी रात्री ९ वाजता श्री भूमिका अदिमाया महिला मंडळ,सावंतवाडा प्रस्तुत व अनिल आसोलकर दिग्दर्शित संतकालिन दोन अंकी अवघी विठाई माझी नाटक सादर होणार आहे.

गुरूवार दि. ८ रोजी रात्री ९.३० वाजता महापुरुष कला मंच सावंतवाडा प्रस्तुत गौरीश शेटगावकर दिग्दर्शित संगीत 'गोरा कुंभार' नाटक होईल. शुक्रवार दि. ९ रोजी संध्याकाळी ६ वाजता साची डान्स अॅकॅडमी प्रस्तुत कलोत्सव सादर होणार आहे.

शनिवार १० मे रोजी संध्याकाळी ७ वाजता महापुरुष कला व संस्कृतिक युवा मंडळातर्फे फॅन्सी ड्रेस व नृत्य स्पर्धा (सावंतवाडा मर्यादित) होणार आहे.

रविवार दि. ११ रोजी रात्री ९ वाजता विकास परिषद मांद्रेतर्फे संचालित रमाकांत खलप विद्यालय मांद्रे व न्यू इंग्लिश प्राथमिक विद्यालय तर्फे संगीत 'सौभद्र' नाटक होईल. सोमवार दि. १२ मे रोजी रात्री ९ वाजता श्री ओंकार थिएटर्स पेडणे गोवा प्रस्तूत 'रायगडाला जेव्हा जाग येते' नाटक होणार आहे.

---

### मांद्रे सावंतवाडा येथे उद्या 'लावणी भुलली अभंगाला'

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २ :** सावंतवाडा येथील श्री देवी भूमिका मातेचा वाढदिवस उत्सव सोहळ्यात शनिवार दि. ३ रोजी रात्री १० वाजता तरुण हौशी नाट्य मंडळातर्फे संगीत 'लावणी भुलली अभंगाला' नाटक, श्री देवी भूमिका देवस्थान पटांगणात सादर होणार आहे. तत्पूर्वी सकाळी धार्मिक विधी, महाआरती,तीर्थप्रसाद, महाप्रसाद होईल. संध्याकाळी ४ वाजता श्री सत्यनारायण महापूजा, पावणी होईल.

या नाटकाचे निर्माता दयानंद सावंत, सूत्रधार विवेक सावंत, दिग्दर्शक सखाराम सावंत, सह दिग्दर्शन संतोष सावंत, ऑर्गनसाथ नाना आ सोलकर, तबला दत्तराज च्यारी, पार्श्वसंगीत निलेश नाईक, पखवाज ढोलकी आदित्य वालावलकर, ध्वनी सुभाष साऊंड सर्व्हिस, रंगमंच श्री देवी म्हाळसा नाट्यलंकर, मांद्रे यांची आहे. या नाटकात रावजी देऊ सावंत, सुशांत सावंत, नारायण सावंत, भिवा सावंत, कृष्णा नाईक, सोनिया शेट्ये, उत्कर्षा चंद्रशेखर रेवोडकर व संत तुकारामाच्या भूमिकेत अॅड. अमित सावंत आहेत.

---

### 'प्रकाशस्तंभ' पुस्तकाचे उद्या प्रकाशन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २ :** पेठेचावाडा कोरगाव येथील लेखक राजमोहन शेट्ये यांच्या 'प्रकाशस्तंभ' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा रविवार दि. ४ रोजी सायंकाळी ४.३० वाजता श्री साळेश्वर मंदिर पेठेचा वाडा कोरगाव येथे आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गोवा माध्यमिक तथा उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष भगीरथ शेट्ये उपस्थित राहणार आहेत तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष प्रा.अनिल सामंत असतील या पुस्तकावर धेंपे कॉलेज ऑफ कॉमर्स ऑफ इकॉनॉमिक्सचे प्राचार्य डॉ मनोज कामत या पुस्तकावर भाष्य करतील. याशिवाय सन्माननीय अतिथी म्हणून गोमंतक साहित्य सेवक मंडळाचे अध्यक्ष रमेश वसकर व श्री साळेश्वर देवस्थानचे अध्यक्ष रामा शेट्ये उपस्थित राहणार आहेत. शिवशक्ती संघ पेडणे आणि पूर्णय क्रियेशन कोरगांव तर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. राजमोहन शेटये यांची आतापर्यंत २ पुस्तके प्रकाशित झाली आहे. ही तिसरे पुस्तक असून विचारवेल हे पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

---







## लईराई जत्रोत्सवास प्रारंभ...

शिरगाव येथील लईराई जत्रेस मंगलमय वातावरणात प्रारंभ झाला. भाविकांची मोठी गर्दी लोटली असून व्रतस्थ धोंड तसेच भाविकांनी दर्शन घेण्यासाठी गर्दी केली आहे. अग्निदिव्यासाठी होमकुंड तयार झाले असून भाविकांनी दर्शन घेत प्रदक्षिणा काढल्या. काहींनी लाकडाच्या मोळी अर्पण करीत नवस फेडले, देवींची चिरा वाजत गाजत काढण्यात आली. देवीच्या पवित्र तळीत धोंडांनी स्नान केले. वाहतूक पोलिस व पोलीस टीमने चोख व्यवस्था ठेवली आहे.

---

# बेकायदेशीर स्टॉल्स, अनधिकृत केबल्स वीज विभागाच्या रडारवर

## कठोर पावले उचलण्याचा निर्णय | काशीनाथ शेट्ये यांची माहिती

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २ :** पणजीतील कारवाईनंतर वीज विभागाने आता मडगावमधील बेकायदेशीर स्टॉल्स आणि अनधिकृत केबल्सविरोधात कठोर पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. विभागाचे कार्यकारी अभियंता काशीनाथ शेट्ये यांनी ही माहिती दिली.

आके – मडगाव येथील वीज विभागाच्या कार्यालयालगतच्या फूटपाथवर उभारण्यात आलेले अनधिकृत स्टॉल्स हटवण्याची मोहीम लवकरच सुरू होणार असल्याचे शेट्ये यांनी स्पष्ट केले. या स्टॉल्सना उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कोणतीही परवानगी नाही. हे स्टॉल्स विभागाच्या मालमत्तेवर आपत्कालीन प्रवेशास अडथळा निर्माण करत आहेत. विभागाच्या वाहनांना सहजपणे प्रवेश मिळावा यासाठी संबंधित जागेचा पुनर्विकास करण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

स्टॉल धारकांना स्वेच्छेने जागा रिकामी करण्यासाठी चार दिवसांची मुदत देण्यात आली असून, दिलेल्या मुदतीत कारवाई न झाल्यास जबरदस्तीने हटवले जातील, असा इशाराही शेट्ये यांनी दिला. तसेच, अनेक स्टॉल्स हे स्थानिक गोमंतकीयांऐवजी बाहेरील व्यक्तींनी चालवलेले असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले.



शेट्ये यांनी पुढे सांगितले की, सार्वजनिक पदपथांवर व्यवसाय करणे बेकायदेशीर आहे. अशा अतिक्रमणांमुळे आपत्कालीन सेवा आणि विभागीय कार्यात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे अशा अनधिकृत स्टॉल्सविरोधात कठोर पावले उचलली जातील.

दुसरीकडे, काही स्टॉल्स धारकांनी विभागाच्या कारवाईवर आक्षेप घेतला असून, त्यांना कोणतीही पूर्वसूचना मिळाल्याचे ते नाकारत आहेत. याशिवाय, विभागाने मडगाव शहरात वीज खांबांवर आणि भूमिगत वीज वाहिन्यांजवळ अनधिकृतपणे टाकण्यात आलेल्या इंटरनेट केबल्सविरोधातही कारवाईचे संकेत दिले आहेत. या केबल्स कोणताही समन्वय किंवा परवानगी न घेता बसवण्यात आल्या आहेत, ज्यामुळे सुरक्षिततेचा धोका निर्माण झाला आहे, असे शेट्ये म्हणाले.

सदर प्रकरणांवर न्यायालयीन प्रक्रिया सुरू असून, ५ व ८ मे रोजी होणाऱ्या सुनावणीच्या निकालावर विभागाचे पुढील पावले अवलंबून आहेत. न्यायालयाच्या आदेशानंतर, अनधिकृत केबल्ससाठी जबाबदार असलेल्या कंपन्यांवर दंडात्मक कारवाई तसेच आवश्यक असल्यास त्यांच्या मालमत्तेच्या जप्तीची कार्यवाही केली जाईल, असेही शेट्ये यांनी स्पष्ट केले. वीज विभागाच्या म्हणण्यानुसार, या मोहिमेचा उद्देश म्हणजे सार्वजनिक जागेचे पुनरुद्धार आणि विभागाच्या कार्यक्षमतेसाठी आवश्यक असलेल्या सुरक्षिततेची हमी. आगामी कारवाईमुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना ठोस संदेश मिळेल, असा विश्वास विभागाने व्यक्त केला आहे.

---

# सार्वजनिक इमारतींतील अग्निसुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २ :** नुवे येथील पंचायत इमारतीला लागलेल्या आगीच्या घटनेनंतर सार्वजनिक इमारतींतील अग्निसुरक्षा उपाययोजनांबाबत गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, सासष्टी तालुक्यातील विविध पंचायत इमारती आणि शासकीय कार्यालये ही कोणतीही ठोस सुरक्षा व्यवस्था नसलेल्या अवस्थेत कार्यरत असल्याचे उघड झाले आहे.

या घटनेमुळे जनतेत तीव्र चिंता निर्माण झाली असून, स्थानिक नेते आणि रहिवाशांनी त्वरित सुरक्षा उपायांची अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. संबंधित घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी सरकारी दस्तऐवजांचे आणि मालमत्तेचे नुकसान झाल्याचे समोर आले आहे.

मडगाव नगर परिषदेचे माजी अध्यक्ष सॅव्हियो कुतिन्हो यांनी या संदर्भात तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटले की, बहुतेक नव्हे तर जवळपास सर्वच पंचायत घरे आणि नगरपालिका इमारतींमध्ये मूलभूत अग्निसुरक्षा उपकरणांचा अभाव दिसून येतो. ही स्थिती अत्यंत गंभीर असून, प्रशासनाच्या उदासीनतेचे द्योतक आहे.

कुतिन्हो यांनी पुढे सांगितले की, अग्निशमन विभागाच्या सूचनांनुसार त्वरित तपासणी व आपत्कालीन सुविधा उभारणे आवश्यक आहे. अनेक कार्यालयांमध्ये साठवलेले महत्त्वाचे दस्तऐवज आगीच्या घटनेत नष्ट होण्याचा धोका कायम असतो, पण त्याची प्रशासनाकडून फारशी दखल घेतली जात नाही.

केळशी ग्रामपंचायतीचे सरपंच डिक्सन वाज यांनीही याबाबत चिंता व्यक्त करत सांगितले की, सर्व सार्वजनिक इमारतींमध्ये अग्निशामक यंत्रणा, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग आणि नियमित सराव ड्रिल्स यांसारख्या सुरक्षा उपाययोजना सक्तीच्या असाव्यात. ही आवश्यकता केवळ खाजगी मॉल किंवा व्यावसायिक इमारतींसाठी नसून शासकीय कार्यालयांसाठीही तेवढीच महत्त्वाची आहे.

दवरली येथील रहिवासी शिरिश नाईक यांनी देखील सरकारला यावर कठोर पावले उचलण्याचे आवाहन करत सांगितले, प्रत्येक विभागाला अग्निसुरक्षेच्या बाबतीत स्पष्ट आणि बंधनकारक निर्देश देणे सरकारच्या जबाबदारीत येते. नुवेमधील आगीनंतर गोव्यातील सरकारी पायाभूत सुविधांमधील आपत्कालीन तयारीतील त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. या घटनेने सुरक्षा नियमांकडे होत असलेल्या दुर्लक्षाचे गंभीर परिणाम अधोरेखित केले आहेत. सध्या स्थानिक जनतेचा दबाव वाढत असताना, प्रशासनाकडून अग्निसुरक्षा नियमांची काटेकोर अंमलबजावणी होईल आणि भविष्यातील दुर्घटनांपासून जीवित व मालमत्तेचे रक्षण होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

---

# मारियो मिरांडा यांचे जन्मशताब्दी वर्षा राष्ट्रीय स्तरावर साजरे करण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २ :** भारताचे प्रतिष्ठित व्यंगचित्रकार आणि पद्मविभूषण पुरस्कार विजेते मारियो मिरांडा यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होत असताना, 'मडगावचो आवाज' या संघटनेने राज्य सरकारला राष्ट्रीय स्तरावर श्रद्धांजली वाहण्याचे आवाहन केले आहे.गोव्यातील या महान कलाकाराच्या वारशाचा सन्मान करण्यासाठी अधिकृत उत्सव, प्रदर्शने, शैक्षणिक कार्यक्रम आणि स्मारकाचे बांधकाम सुरू करण्याचे आवाहन या संघटनेने केले आहे .




मारियो मिरांडा यांनी त्यांच्या कलेच्या माध्यमातून भारतीय जीवनाचे सार टिपले आणि पिढ्यांवर अवीट छाप सोडली. आपण त्यांच्या १०० व्या जयंतीच्या वर्षात प्रवेश करत असताना, सरकारने पाऊल उचलणे आणि त्यांचे योगदान त्यांच्या प्रतिमेला साजेसे साजरे केले जावे, अशी मागणी 'मडगावचो आवाज' संघटनेचे प्रभाव नाईक यांनी केली आहे .

नाईक यांनी यावर भर दिला की, मिरांडाची शताब्दी साजरी करणे ही केवळ एखाद्या व्यक्तीचे स्मरण करण्याबद्दल नाही तर सांस्कृतिक वारशाची ओळख पटवण्याबद्दल आहे. पद्मभूषण पुरस्कार विजेते चित्रकार लक्ष्मण पै आणि प्रशंसित सिनेमॅटोग्राफर के. वैकुंठ उर्फ वैकुंठ कुंकळीकर यांच्यासह इतर प्रख्यात गोवेकर देखील त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात पदार्पण करत आहेत आणि त्यांनाही अशाच प्रकारे मान्यता मिळण्यास पात्र आहेत, यावर त्यांनी भर दिला.

हे टप्पे साजरे करणे ही तरुणांना आपल्या सांस्कृतिक इतिहासाशी पुन्हा जोडण्याची संधी आहे. यातील अनेक व्यक्तिमत्त्वे नवीन पिढ्यांना फारशी माहिती नाहीत आणि सार्वजनिक स्मारकांमुळे त्यांचे जीवन आणि योगदान पुन्हा ओळखण्यास मदत होईल,असे नाईक म्हणाले.

त्यांनी नियमित सरकारी कार्यक्रमांच्या दीर्घकालीन सांस्कृतिक मूल्याशिवाय मोठे बजेट वापरण्याच्या प्रवृत्तीवर टीका केली. त्याऐवजी, त्यांनी त्या निधीचा एक भाग अर्थपूर्ण शताब्दी उत्सवांकडे वळवण्याचा सल्ला दिला ज्यामुळे समुदायांना समृद्ध होईल आणि पिढ्यांमधील शिक्षणाला चालना मिळेल. हे अल्पकालीन कार्यक्रम नाहीत. शताब्दी उत्सवांचे खोल शैक्षणिक आणि सांस्कृतिक मूल्य असते. ते एकता वाढवतात, अभिमान निर्माण करतात आणि सामायिक ओळख मजबूत करतात. ते हे देखील सुनिश्चित करतात की सार्वजनिक खर्च दीर्घकालीन सामाजिक समृद्धीमध्ये योगदान देतो, असे ते म्हणाले. नाईक यांनी उत्सव योजनांचा भाग म्हणून सार्वजनिक प्रदर्शने, शालेय कार्यक्रम, माहितीपट आणि समर्पित स्मारके समाविष्ट करण्याचे आवाहन केले.

---

# नुवे–आर्लेम बायपासवरील कचरा हटवण्याची गोवा कॅनची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २ :** नुवे–आर्लेम बायपास मार्गावर प्लास्टिक, बांधकाम साहित्य, तसेच वैद्यकीय सिरिंजसह विविध प्रकारचा कचरा बिनधास्त टाकला जात असल्याने परिसरात गंभीर आरोग्य आणि सुरक्षिततेचे संकट निर्माण झाले आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत, नागरी हक्कांसाठी काम करणाऱ्या गोवा कॅन संस्थेने तात्काळ शासकीय हस्तक्षेपाची मागणी केली आहे.

या पार्श्वभूमीवर गोवा कॅन ने दक्षिण गोवा जिल्हाधिकारी, गोवा कचरा व्यवस्थापन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता, पंचायत उपसंचालक (दक्षिण), वाहतूक पोलिस अधीक्षक, गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव आणि आरोग्य सेवा संचालक यांच्यासह संबंधित विभागांना पत्र पाठवून तातडीने उपाययोजना राबवण्याची विनंती केली आहे.



संस्थेने आपल्या पत्रात नमूद केले आहे की, बायपासवर कचरा टाकण्याची समस्या नवीन नाही, मात्र अलीकडच्या काळात या समस्येने अधिकच गंभीर वळण घेतले आहे. कुक्कुटपालन कचऱ्यामुळे निर्माण होणारी दुर्गंधी आणि वैद्यकीय सिरिंजसारख्या धोकादायक वस्तूंची उपस्थिती ही सार्वजनिक आरोग्यासाठी मोठा धोका ठरत आहे. या भागात वस्ती नसल्याने व रात्रीच्या वेळी पुरेशा प्रकाशाचा अभाव असल्याने प्रवाशांसाठी अपघाताचा धोका वाढतो आहे.

स्थानिक नागरिकांनी देखील यासंदर्भात वारंवार तक्रारी केल्या असून, संबंधित यंत्रणांकडून होत असलेल्या दुर्लक्षाबाबत नाराजी व्यक्त केली आहे. बायपासलगतचे शेतकरी व भाजीपाला विक्रेते दिवसभर दुर्गंधीच्या स्थितीत काम करतात, ज्याचा त्यांच्या उपजीविकेवर प्रतिकूल परिणाम होत आहे. नुवे–आर्लेम बायपास रस्त्याच्या कडेला असलेला शोल्डर आता खुले डंपिंग ग्राउंड बनत चालला आहे, असे गोवा कॅन ने स्पष्ट केले असून, यामागे अंमलबजावणीचा अभाव कारणीभूत असल्याचे नमूद केले आहे.

गोवा कॅनने संबंधित अधिकाऱ्यांना समन्वित स्वच्छता मोहीम हाती घेण्याचे, नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे आणि या भागात सातत्यपूर्ण देखरेख ठेवण्याचे आवाहन केले आहे. यासोबतच, गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि आरोग्य विभागाने परिसराचे मूल्यांकन करून पर्यावरणीय आणि जैविक धोके तपासावेत, अशी मागणीही संस्थेने केली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे, नुवे–आर्लेम बायपास हा सासष्टी तालुक्यातील महत्त्वाचा दळणवळण मार्ग आहे. त्यामुळे याठिकाणी अस्वच्छता आणि सुरक्षिततेचा अभाव असल्यास मोठ्या प्रमाणात नागरिकांना त्याचा फटका बसण्याची शक्यता आहे.

---

# नावेलीमधील अनधिकृत शेड पाडण्याचे पंचायत संचालनालयाचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २ :** नावेली गावातील कलवाडा परिसरात एका खासगी मालमत्तेच्या सेटबॅक क्षेत्रात उभारण्यात आलेल्या अनधिकृत शेडवर अखेर कारवाईचा आदेश देण्यात आला आहे. पंचायत संचालनालयाने ही बांधकाम बेकायदेशीर ठरवत ते पाडण्याचे निर्देश दिले आहेत. हा आदेश अँथनी ब्रिटो या स्थानिक रहिवाशाच्या दीर्घकाळ चाललेल्या कायदेशीर लढ्यानंतर जारी करण्यात आला आहे.

पंचायत–२ (दक्षिण गोवा) च्या अतिरिक्त संचालकानी दिलेल्या निर्णयात, रोसारिन्हो एम. फर्नांडिस आणि त्यांची पत्नी फातिमा फर्नांडिस यांनी गोवा इमारत नियमावली, २०१० च्या उल्लंघनासह सदर शेड उभारल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. ही अनधिकृत रचना ब्रिटो यांच्या मालमत्तेला लागून असलेल्या सर्वेक्षण क्र. ६८/८ मध्ये, इमारतीच्या पूर्वेकडील सेटबॅक क्षेत्रात बांधण्यात आली होती.

ब्रिटो यांनी १३ ऑक्टोबर २०२२ रोजी ग्रामपंचायतीकडे तक्रार दाखल केली होती. त्यांनी या बांधकामासाठी कोणतीही अधिकृत परवानगी घेण्यात आलेली नसल्याचा आरोप केला होता. त्यांच्या म्हणण्यानुसार, संचालनालयाने स्पष्ट निर्देश दिले असतानाही नावेली ग्रामपंचायतीने आवश्यक ती कारवाई केली नाही. परिणामी, त्यांनी न्यायालयीन मार्गाचा अवलंब केला.

निर्णयात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित शेड तात्पुरते नसून अपीलकर्त्यांकडे त्यासाठी कोणतीही वैध मंजुरी नाही. ग्रामपंचायतीने १० नोव्हेंबर २०२२ रोजी तयार केलेल्या पंचनाम्यात व रेखाचित्रात बांधकाम नियमांचे उल्लंघन स्पष्टपणे नोंदवण्यात आले आहे.

अपीलकर्त्यांनी बांधलेली रचना इमारतीच्या पूर्व भागातील सेटबॅक क्षेत्रात असून ती गोवा इमारत नियम २०१० च्या विरोधात आहे, असे आदेशात म्हटले असून, ती रचना बेकायदेशीर असल्याचे ठामपणे नमूद करण्यात आले आहे.

पंचायत सचिवांना हे बांधकाम त्वरित पाडण्याचे आदेश दिले असून, अपीलकर्त्यांनी स्वखुशीने ती रचना न हटविल्यास विध्वंस पथकाची मदत घेऊन ते पाडण्यात यावे, असे स्पष्ट निर्देश दिले गेले आहेत. या निर्णयानंतर प्रतिक्रिया देताना अँथनी ब्रिटो यांनी समाधान व्यक्त करत न्याय मिळवण्यासाठी आपल्याला एका खांबापासून दुसऱ्या खांबापर्यंत धावावे लागल्याचे सांगितले. स्थानिक संस्थेच्या निष्क्रियतेनंतरही त्यांनी या प्रकरणात न्याय मिळवण्याचा निर्धार सोडला नाही, असे त्यांनी नमूद केले.